# दैनिक झाडाझडती

दैनिक झाडाझडती

नव्याने सुरू होत असलेल्या वेब पोर्टलसाठी जिल्ह्यात सर्वत्र वार्ताहर नेमणे आहेत.

संपर्क : ९७६३२२५०५१

✻ परभणी ✻ वर्ष १५ वे ✻ अंक नं. २१ ✻ शनिवार दि. ५ सप्टेंबर २०२६ ✻ पाने ४ ✻ किंमत ३ रुपये

Parbhani Year 15 Issue No. 21 Saturday, 5 September 2026 Pages 4 Price Rs. 3/-


# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ द्या

## निम्न दुधना, जायकवाडी प्रकल्पातून पाणी सोडा- आ.डॉ.राहुल पाटील



### खरीप पिकांसाठी तातडीने पाणी सोडा

परभणी जिल्ह्यात चालू खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, पिके वाचविण्यासाठी निम्न/दुधना प्रकल्प तसेच जायकवाडी प्रकल्पाच्या माध्यमातून डाव्या कालव्यात व नदीपात्रात तात्काळ पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी यावेळी आमदार डॉ. पाटील यांच्या वतीने करण्यात आली.

**परभणी/प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कापूस सोयाबीन, हळद उत्पादक शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ द्या अशी मागणी आमदार डॉ. राहुल पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. आमदार डॉ पाटील यांच्या वतीने शिवसेनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.

यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परभणी तालुक्यात मागील काही वर्षांपासून हळद पिकाखालील क्षेत्रात सातत्याने वाढ होत असून, यावर्षी तब्बल २ हजार १४२ शेतकऱ्यांनी १ हजार ३९२ हेक्टर क्षेत्रावर हळद पिकासाठी सन २०२६-२७ मध्ये विमा संरक्षण घेतले आहे. मात्र, चालू खरीप हंगामात जून व जुलै महिन्यात सातत्याने कमी पाऊस झाला. सरासरी २४७ मि.मी. पावसाच्या तुलनेत केवळ ७७.६ मि.मी. पावसाची नोंद झाली असून, परभणीतील हळद पिकाला आवश्यक त्या प्रमाणात पाणी उपलब्ध झालेले नाही.

पावसाअभावी हळद पिकांची वाढ मोठ्या प्रमाणावर खुंटली असून, अनेक ठिकाणी पिके वाळून जाण्याच्या स्थितीत आहेत. परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पादनावर मोठा विपरीत परिणाम होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. तसेच सोयाबीन, कापूस, मुग पिके देखील संकटात आहेत वाढता उत्पादन खर्च, मजुरी, खत, औषधे व इतर निविष्ठांच्या खचार्मुळे शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत असताना पावसाच्या अनियमिततेमुळे त्यांच्यावर आणखी मोठे संकट ओढवले आहे.

या पार्श्वभूमीवर, परभणी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचा लाभ द्यावा अशी मागणी आमदार डॉ. पाटील यांनी केली. यंदाच्या खरीप हंगामात पावसाने मोठा खंड दिल्यामुळे जिल्ह्यातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करून शेतकऱ्यांच्या हितासाठी तातडीने पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे आ.डॉ. राहुल पाटील यांनी म्हटले आहे. संबंधित प्रकल्पांमधून डाव्या कालव्यात आवश्यक प्रमाणात पाणी सोडण्यात यावे अशी मागणी केली.

यावेळी महानगर प्रमुख विवेक नावंदर, जिल्हा प्रमुख विष्णु मुरकुटे, महिला आघाडी जिल्हा प्रमुख अंबिका डहाळे, उपजिल्हा प्रमुख संजय गाडगे, माजी शहरप्रमुख अनिल डहाळे, कृउबा सदस्य अरविंद देशमुख, शहरप्रमुख ज्ञानेश्वर पवार, माजी जिल्हाप्रमुख संदीप भंडारी, रविंद्र पतंगे, नगरसेवक बबलु घागरमाळे, रामराव डोंगरे, संदीप झाडे, बाळराजे तळेकर, विशु डहाळे, दत्तराव मुळे, संभानाथ काळे, वंदना कदम, दगडु काळदाते, शिवलिंग बोधणे, सुशिल नर्सीकर, देवेंद्र देशमुख, गणेश मुळे, महेश येरळकर, लखन पवार, उध्दव गरूड, रामा कदम, विठ्ठल धस, रामप्रसाद जोगदंड, हनुमान भालेराव, श्रीकांत भालेराव, अक्षय भराडे, बाळासाहेब गरूड, कैलास पतंगे, रमेश शेरे, दामोधर सानप, विनोद कदम उपस्थित होते.

# पुढील टप्प्यातील कामे अधिक पारदर्शक आणि अचूकपणे करावीत- जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

## विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेत परभणी जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी



**परभणी/प्रतिनिधी**

विशेष सखोल पुनरिक्षण -२०२६ अंतर्गत राज्यात परभणी जिल्ह्याचे काम अतिशय उल्लेखनीय झाले आहे. याबद्दल स्वत: महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी कौतुक केले. दरम्यान, पुढील टप्प्यात करण्यात येणारी महत्त्वाची कामेही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अधिक दक्षतेने व अचूक पध्दतीने करावीत, अशी सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात केली.

विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षणातंर्गत परभणी जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी दि. ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली. मतदारांना प्रारूप यादीत आपले नाव, पत्ता व इतर तपशील तपासून काही त्रुटी असल्यास किंवा पात्र असूनही नाव समाविष्ट नसल्यास ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत विहित नमुन्यात दावे व हरकती दाखल करता येणार आहे. त्यानंतर दि. २९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत. तर अंतिम मतदार यादी दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिध्द केली जाणार आहे.

दावे व हरकती तसेच नो मॅपिंग, अनोमली प्रकरातील मतदारांच्या सुनावणी कागद पडताळणीबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, संगीता चव्हाण, शैलेश लाहोटी, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भोन्सीकर यांच्यासह मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. चव्हाण म्हणाले की, विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षणातंर्गत पुढील टप्प्यातील काम हे अतिशय जबाबदारीचे आहे. याबाबत भारत निवडणूक आयोग व महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाचे काटेकोर पालन करावे. प्राप्त दावे व हरकती सुनावणी घेण्याबाबतची कार्यपध्दती समजून घ्यावी. अंतिम मतदार यादी पारदर्शक व अचूक असेल याची दक्षता घ्यावी. प्रत्येक पात्र मतदाराची मतदार यादीत नोंद होईल आणि कोणत्याही अपात्र व्यक्तीचा समावेश होणार आहे, याची काळजी घ्यावी.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती संगेवार यांनी विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षणातंर्गत करण्यात येणाऱ्या पुढील बाबींबाबत उपस्थितांना सादरीकरणाव्दारे सविस्तर मार्गदर्शन केले.

### मतदारांना जिल्हाधिकारी यांचे आवाहन

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण-२०२६ (SIR) अंतर्गत परभणी जिल्ह्यातील चारही (जिंतूर, परभणी, गंगाखेड, पाथरी) विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदारांनी प्रारूप यादीत आपले नाव, पत्ता व इतर तपशील तपासून काही त्रुटी असल्यास किंवा पात्र असूनही नाव समाविष्ट नसल्यास ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत विहित नमुन्यात दावे व हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

# परभणीत सोमवारपासून 'अमृतपेठ थेट बाजारपेठ'चे दोन दिवस आयोजन

## स्थानिक उद्योजक, उत्पादकांना विक्रीसाठी भव्य व्यासपीठ; नागरिकांनी कुटुंबासह भेट देण्याचे आवाहन

**परभणी/प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)च्या वतीने खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील उत्पादक व स्थानिक उद्योजकांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी दि. ७ व ८ सप्टेंबर रोजी 'अमृतपेठ थेट बाजारपेठ'चे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम कौस्तुभ मंगल कार्यालय, परभणी येथे सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत प्रदर्शन व विक्री करण्यासाठी सर्वांना खुला राहणार आहे.

'अमृतपेठ थेट बाजारपेठ'च्या माध्यमातून स्थानिक उत्पादक व विक्रेत्यांना त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रदर्शनात विविध प्रकारच्या वस्तू, स्वादिष्ट खाद्यपदार्थ, कपडे, घरगुती उपयोगाच्या वस्तू, कलात्मक वस्तू, ज्वेलरी आदी उत्पादनांचे स्टॉल राहणार आहेत.

स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देणे, स्थानिक उद्योजकांना त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि नागरिकांना दर्जेदार व विश्वासार्ह उत्पादने उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे अमृत संस्थेचे परभणी जिल्हा व्यवस्थापक अनिरुद्ध काटे यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी अमृत जिल्हा कार्यालय, जुनी प्रशासकीय इमारत, पहिला मजला, बीएसएनएल कार्यालयाच्या बाजूला, परभणी येथे संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# गट-क संवर्गाची सुधारित अंतिम अनुकंपा नियुक्ती प्रतीक्षा यादी प्रसिद्ध

**परभणी/प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या आदेशानुसार काही अनुकंपा प्रकरणांतील उमेदवार तसेच अन्य अनुकंपा उमेदवारांनी प्रतीक्षा यादीत नावे समाविष्ट करण्याची विनंती केली होती. या पार्श्वभूमीवर संबंधित उमेदवारांच्या प्रकरणांचा विचार करून सुधारित गट क संवर्गाची अनुकंपा नियुक्ती प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांनी सुधारित अंतिम प्रतीक्षा यादीची संबंधित अनुकंपा उमेदवारांना तातडीने अंमलबजावणी करून त्याची तामील प्रत कार्यालयास सादर करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच प्रतीक्षा यादी प्रसिद्ध केल्याबाबतचा प्रसिद्धी पंचनामा तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. सुधारित अनुकंपा नियुक्ती प्रतीक्षा यादी परभणी जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्यासंदर्भातील सुधारित शासन निर्णयानुसार परभणी जिल्ह्यातील सर्व नियुक्ती प्राधिकारी कार्यालय प्रमुखांकडून गट-क संवर्गाची अनुकंपा नियुक्ती प्रतीक्षा यादी मागविण्यात आली होती. जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त माहितीनुसार दि. २८ ऑगस्ट २०२५ अखेरच्या अद्ययावत एकत्रित सामायिक अंतिम अनुकंपा नियुक्ती प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी अनुकंपा नियुक्ती मेळावा आयोजित करून पात्र अनुकंपा उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. त्यानंतर शासन निर्णयानुसार दि. १ मार्च २०२६ रोजीची अंतिम अनुकंपा नियुक्ती प्रतीक्षा यादी कार्यालयाच्या परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध करण्यात आली होती.

# जिंतूर तालुका कोरडा दुष्काळ ग्रस्त जाहीर करा-मा.आ.विजय भांबळे

## मागील वर्षाचा व चालू वर्षाचा पीक विमा देखील वितरित करा

**परभणी/प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यांत पावसाचा मागील दोन महिन्या-हून अधिक काळ खंड पडल्यामुळे पिके धोक्यात आल्याने पंचनामे न करता सरसकट आर्थिक मदत देणे तसेच मागील वर्षाचा व चालू वर्षाचा पीक विमा वितरित करण्यासाठी मा.आ.विजयराव भांबळे व राष्ट्रवादी काँग्रेस जिंतूरच्या वतीने तहसीलदार जिंतूर यांना लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली, यावेळी कृषी अधिकारी घुगे पुरवठा विभागाचे होळंबे व विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.



जिंतूर तालुक्यात यावर्षी खरीप हंगामाच्या सुरुवातीला पाऊस समाधानकारक होईल या अपेक्षेने परिसरातील शेतकऱ्यांनी कर्ज काढून, कशीबशी जुळवाजुळव करून खरीप पिकांची सोयाबीन, कापूस, तूर, मुग, उडीद, हाळद, ऊस, कांदा, राजमा व फळ बागांची मोठ्या कष्टाने पेरणी केली होती. परंतु, मागील दोन महिन्याहून अधिक काळ जिंतूर तालुक्यात पावसाने पूर्णपणे खंड पाडला आहे. कडक ऊन आणि पावसामुळे शेतातील पिके मान टाकून सुकण्याच्या मार्गावर आहेत. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची वेळ आली असून, शेतकरी तीव्र आर्थिक व मानसिक संकटात सापडला आहे. त्यामुळे पंचनामे न करता सरसकट आर्थिक मदत करणे, पावसाच्या खंडामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पारंपरिक व जाचक अटींचे पंचनामे करत बसल्यास शेतकऱ्यांचा वेळ आणि मानसिक त्रास वाढेल. त्यामुळे कोणत्याही जाचक अटी व पंचनाम्यांची औपचारिकता न पाळता, जिंतूर व सेलू तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सोयाबीन, कापूस, तूर, मुग, उडीद, हाळद, ऊस, कांदा, राजमा ई.पिकांसाठी सरसकट हेक्टरी २५ हजार रुपये तर फळ बागेसाठी हेक्टरी ४० हजार रुपये एवढी भरीव आर्थिक मदत तातडीने जाहीर करून खात्यात जमा करावी. मागील वर्षाचा खरीप व रब्बी पीक विमा तात्काळ वितरित करा, मागच्या वर्षीच्या (खरीप व रब्बी) पीक विम्याची रक्कम अद्यापही अनेक पात्र शेतकऱ्यांना मिळालेली नाही. प्रशासनाने विमा कंपन्यांना सूचना देऊन मागील वर्षाचा रखडलेला पीक विमा तात्काळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावा. तसेच चालू वर्षाचा खरीप पीक विमा तात्काळ मंजूर करून वितरित करा, चालू खरीप हंगामात पावसाने मोठा दगा दिल्यामुळे नैसर्गिक आपत्ती ओढवली आहे. चालू वर्षाच्या खरीप पिकाचा पीक विमा तात्काळ मंजूर करून, अंतरिम मदत म्हणून विमा रक्कम तातडीने वितरित करावी. तसेच जिंतूर व सेलू दोन्ही तालुके दुष्काळग्रस्त घोषित करा, जिंतूर व सेलू तालुक्यात पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची गंभीर दखल घेऊन या दोन्ही तालुक्यांना 'दुष्काळग्रस्त' किंवा 'कमी पावसामुळे प्रभावित क्षेत्र' घोषित करण्यात यावे, जेणेकरून शेतकऱ्यांना वीज बिल माफी, कर्ज वसुलीला स्थगिती व इतर शासकीय सवलती तात्काळ मिळू शकतील. तसेच या निवेदनाची गंभीर व तात्काळ दखल घेऊन सदर मागण्या शासन दरबारी पाठवून शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी त्वरित पावले उचलावीत, अन्यथा परिसरातील शेतकऱ्यांना नाइलाजाने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल, याची नोंद घ्यावी. अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनावर मा.आ.विजयराव भांबळे, तालुकाध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत, जि.पं.सदस्य अजयराव चौधरी, माणिकराव हरकळ, शंकरराव जाधव, माजी जि.पं.सदस्य विश्वनाथ राठोड, बाळासाहेब घुगे, विठ्ठलराव घोगरे, पं.स.सदस्य नंदकिशोर अंभूरे, अविनाश मस्के, मुजाहेद कादरी, राहुल कणकुटे, माजी सभापती मधुकरराव भवाळे, गणेशराव इलग, शरद अंभूरे, विजय खिस्ते, नगरसेवक जाबेर भाई, करीम लाला, माजी नगरसेवक मनोहर डोईफोडे, आहेमद बागबान, शाहेद बेग मिर्झा यांच्यासह सरपंच कवडा राजेश चव्हाण, माधव घोगरे, सुधारक मस्के, राहुल घुले, अभिजित भांबळे, शौकत लाला, खयुम कादरी, सुलेमान सिद्धिकी, अक्कू भाई, जगदीश शेंद्रे, सुरेश सानप, जिवन भवरे, शेख जलील, दिनकर सातपुते, ज्ञानेश्वर काळे, गुलाबराव सानप, रामेश्वर गायकवाड, रोहिदास राठोड, ॲड. कपिल निकम, नयुम कादरी, अब्दुल मुखीद, विश्वंभर पडघन, अशोक प्रधान, पंडित जाधव, धर्मा राठोड, श्रीराम जाधव, यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

## संपादकीय

# शिक्षक : ज्ञानदानातून राष्ट्रनिर्मिती करणारा शिल्पकार

५ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे महान तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस शिक्षकांना समर्पित करण्यात आला आहे. शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच शिक्षणाचे आणि शिक्षकांच्या भूमिकेचे समाजातील महत्त्व अधोरेखित करण्याचा हा दिवस आहे. शिक्षक दिन हा केवळ शुभेच्छा देण्याचा किंवा औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसून, शिक्षकांच्या योगदानाचा आणि राष्ट्रनिर्मितीतील त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा विचार करण्याचा दिवस आहे.

शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकातील धडे शिकवणारा व्यक्ती नसतो, तर तो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा शिल्पकार असतो. आई-वडिलांनंतर मुलांच्या जीवनावर सर्वाधिक प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींमध्ये शिक्षकांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाची जिज्ञासा निर्माण करणे, त्यांना योग्य-अयोग्याची जाणीव करून देणे, आत्मविश्वास वाढविणे, शिस्त लावणे आणि समाजाप्रती जबाबदारीची भावना निर्माण करणे, हे शिक्षकांचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. म्हणूनच शिक्षकाला समाजात केवळ 'शिक्षक' म्हणून नव्हे, तर भावी पिढीचा मार्गदर्शक म्हणून पाहिले जाते.

भारतीय संस्कृतीत गुरूला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'गुरू' म्हणजे अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश दाखविणारा. पूर्वीच्या गुरुकुल परंपरेत गुरू-शिष्य नाते अत्यंत पवित्र मानले जात होते. गुरू केवळ शिक्षण देत नव्हते, तर शिष्याला जीवन जगण्याची कला, कर्तव्याची जाणीव, संयम, शिस्त आणि मूल्यांची शिकवण देत होते. काळ बदलला, शिक्षणाच्या पद्धती बदलल्या आणि तंत्रज्ञानाने शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. मात्र गुरूचे महत्त्व आजही कमी झालेले नाही.

आज मोबाईल, इंटरनेट, संगणक आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे माहितीचा प्रचंड साठा विद्यार्थ्यांच्या हातात उपलब्ध आहे. काही सेकंदांत जगभरातील माहिती मिळू शकते. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ माहिती देण्यापुरती राहिलेली नाही. उपलब्ध माहितीचे विश्लेषण कसे करावे, योग्य आणि अयोग्य माहितीतील फरक कसा ओळखावा, अफवा आणि तथ्य यांची चिकित्सा कशी करावी, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर कसा करावा, हे शिकविणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. या बदलत्या परिस्थितीत शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक, समुपदेशक आणि मूल्यशिक्षक म्हणून अधिक महत्त्वाचा ठरतो.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे स्वतः एक महान शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ होते. शिक्षणाच्या माध्यमातून समाज आणि राष्ट्र घडविण्याची शक्ती त्यांनी ओळखली होती. शिक्षक ते राष्ट्रपती असा त्यांचा प्रेरणादायी प्रवास त्यांच्या असामान्य कर्तृत्वाची साक्ष देतो. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा सन्मान करण्यासाठी साजरा होणारा शिक्षक दिन प्रत्येक शिक्षकाच्या योगदानाची जाणीव करून देतो.

आज शिक्षण क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. विद्यार्थ्यांवरील वाढता शैक्षणिक ताण, स्पर्धेची मानसिकता, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, मोबाईलचे व्यसन, बदलती कौटुंबिक परिस्थिती आणि नैतिक मूल्यांपासून दूर जाण्याची प्रवृत्ती यामुळे शिक्षकांची जबाबदारी अधिक वाढली आहे. विद्यार्थ्यांना केवळ चांगले गुण मिळवून देणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असू शकत नाही. त्यांच्यामध्ये माणुसकी, संवेदनशीलता, प्रामाणिकपणा, सहकार्याची भावना, पर्यावरणाबद्दलची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे.

आजच्या काळात शिक्षकांनी स्वतःलाही सतत अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. नवनवीन तंत्रज्ञान, डिजिटल शिक्षणपद्धती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर करून अध्यापन अधिक परिणामकारक करता येऊ शकते. मात्र तंत्रज्ञान हे शिक्षकाची जागा घेणारे साधन नसून शिक्षकाला अधिक सक्षम करणारे माध्यम आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न समजून घेणे, त्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि त्यांना योग्य दिशा देणे हे मानवी नाते तंत्रज्ञान कधीही पूर्णपणे बदलू शकत नाही.

शिक्षकांच्या कार्याचा सन्मान केवळ शिक्षक दिनाच्या दिवशी पुष्पगुच्छ देऊन किंवा शुभेच्छा संदेश पाठवून होऊ शकत नाही. शिक्षकांना समाजात योग्य प्रतिष्ठा, सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यपरिसर, आवश्यक शैक्षणिक साधने आणि प्रशिक्षणाच्या संधी मिळणे आवश्यक आहे. शिक्षकांवर अनावश्यक प्रशासकीय कामांचा भार टाकण्यापेक्षा त्यांना अध्यापनासाठी अधिक वेळ आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. कारण शिक्षक जितका सक्षम असेल, तितकी भावी पिढी अधिक सक्षम होईल.

विद्यार्थ्यांच्या जीवनात काही शिक्षक कायमचे लक्षात राहतात. त्यांच्या एखाद्या वाक्याने, दिलेल्या प्रोत्साहनाने किंवा दाखविलेल्या योग्य मार्गाने विद्यार्थ्याचे संपूर्ण आयुष्य बदलू शकते. एखादा विद्यार्थी अडचणीत असताना त्याच्या पाठीशी उभा राहणारा शिक्षक त्याच्यासाठी केवळ शिक्षक राहत नाही, तर आयुष्यभराचा मार्गदर्शक बनतो. म्हणूनच अनेक यशस्वी व्यक्ती आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांबरोबरच शिक्षकांनाही देताना दिसतात.

शिक्षण म्हणजे केवळ परीक्षा, गुण आणि प्रमाणपत्रे नव्हेत. शिक्षण म्हणजे विचार करण्याची क्षमता, प्रश्न विचारण्याचे धैर्य, निर्णय घेण्याची विवेकबुद्धी आणि जबाबदारीने जगण्याची जाणीव होय. या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचे कार्य शिक्षक करतात. त्यामुळे शिक्षक हा समाजाच्या भविष्याचा शिल्पकार आहे, असे म्हटले तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही.

शिक्षक घडवतो विद्यार्थी, विद्यार्थी घडवतो समाज आणि समाज घडवतो राष्ट्र. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता वर्षभर त्यांच्या कार्याचा आदर केला पाहिजे. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ झाले पाहिजे. पालक, शिक्षक आणि समाज या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे काम केल्यासच संस्कारक्षम, विवेकी आणि जबाबदार पिढी घडू शकते.

आज शिक्षक दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या जीवनात दिशा देणाऱ्या शिक्षकांचे स्मरण करावे. त्यांच्या शिकवणीतील एखादा संस्कार आपल्या आचरणात आणणे, हाच त्यांच्याप्रती खरा आदर ठरेल. ज्ञानाचा दीप तेवत ठेवणाऱ्या, अज्ञानाचा अंधार दूर करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणाऱ्या सर्व शिक्षकांना मनःपूर्वक अभिवादन!

शिक्षक म्हणजे ज्ञानाचा दीप, संस्कारांची शिदोरी आणि राष्ट्रनिर्मितीचा भक्कम आधारस्तंभ.

शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# शिक्षक : ज्ञानाचा दीप ते भविष्याचा शिल्पकार

५ सप्टेंबर हा दिवस देशभरात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षक दिन हा केवळ शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्याचा किंवा शाळा-महाविद्यालयांमध्ये औपचारिक कार्यक्रम आयोजित करण्याचा दिवस नाही. शिक्षणाचे व्यक्ती आणि समाजाच्या विकासातील महत्त्व समजून घेण्याचा, शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्याचा आणि भावी पिढी घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याचा हा दिवस आहे. माणसाच्या जीवनात अनेक व्यक्ती येतात; परंतु त्याच्या विचारांना आकार देणाऱ्या, सुप्त क्षमतांना दिशा देणाऱ्या आणि आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या व्यक्तींमध्ये शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. शिक्षक विद्यार्थ्याला केवळ अक्षरज्ञान देत नाही, तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टी देतो. प्रश्न विचारणे, विचार करणे, निर्णय घेणे, अडचणींना सामोरे जाणे आणि जबाबदारीने वागणे या जीवनकौशल्यांची जडणघडणही शिक्षणातूनच होते. त्यामुळे शिक्षक हा केवळ शिक्षणव्यवस्थेतील एक घटक नसून समाजाच्या भवितव्याला आकार देणारा शिल्पकार आहे.

बालकाच्या समाजीकारण व व्यक्तिमत्त्वविकासात शाळेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे आणि या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी शिक्षक असतो. विद्यार्थ्यांच्या मनात असंख्य प्रश्न, कल्पना आणि विविध क्षमता दडलेल्या असतात. काही विद्यार्थी अभ्यासात प्रगती करतात, काही कला-क्रीडा क्षेत्रात चमकतात, तर काही विज्ञान, तंत्रज्ञान, नेतृत्व किंवा सामाजिक कार्यात विशेष रस दाखवतात. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता आणि शिकण्याची पद्धत वेगळी असते. ती ओळखून योग्य संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षकाचे खरे कौशल्य आहे. विद्यार्थ्यांच्या उणिवांवर भर देण्याऐवजी त्यांच्या सामर्थ्याचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहन देणारा शिक्षक त्यांच्या आयुष्याला सकारात्मक दिशा देऊ शकतो. विद्यार्थ्याला 'तू हे करू शकतोस' असा विश्वास देणे ही शिक्षकाच्या कार्यातील सर्वांत मोठी शक्ती आहे.

आज शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट, इलेक्ट्रॉनिक पुस्तके, दृक्-श्राव्य माध्यमे, ऑनलाइन अभ्यासक्रम, डिजिटल वर्ग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या हातात माहितीचे प्रचंड भांडार उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ माहिती देणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित राहिलेली नाही. उपलब्ध माहितीची सत्यता तपासणे, योग्य-अयोग्य माहितीमधील फरक समजून घेणे, विविध स्रोतांचे मूल्यमापन करणे आणि माहितीचे ज्ञानात रूपांतर करणे ही कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात करून देणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. माहितीच्या महासागरात योग्य दिशा दाखविणारा शिक्षक आजही तितकाच आवश्यक आहे.

तंत्रज्ञान शिक्षणाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि व्यापक करू शकते; मात्र ते शिक्षकाच्या मानवी भूमिकेची जागा घेऊ शकत नाही. संगणक माहिती देऊ शकतो, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रश्नांची उत्तरे देऊ शकते आणि डिजिटल माध्यमे अध्ययन सुलभ करू शकतात; परंतु विद्यार्थ्याच्या मनातील भीती ओळखणे, त्याच्या अडचणी समजून घेणे, अपयशानंतर त्याला पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा देणे आणि त्याच्या क्षमतेवर विश्वास निर्माण करणे हे मानवी शिक्षकच करू शकतो. शिक्षक-विद्यार्थी संबंधातील विश्वास, संवाद आणि भावनिक जवळीक यांना तंत्रज्ञान पर्याय ठरू शकत नाही. म्हणून भविष्यातील शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करताना मानवी संवेदनशीलतेचा समतोल राखणे आवश्यक आहे.

या बदलत्या शैक्षणिक वातावरणाचा विचार करताना ग्रामीण भारतातील वास्तवाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. शहरांमधील अनेक विद्यार्थ्यांना संगणक, इंटरनेट, डिजिटल वर्ग आणि विविध शैक्षणिक साधने सहज उपलब्ध असतात; परंतु ग्रामीण आणि दुर्गम भागातील परिस्थिती वेगळी आहे. अनेक कुटुंबांमध्ये एकच भ्रमणध्वनी असतो आणि तोही पालकांच्या दैनंदिन कामासाठी वापरला जातो. काही भागांत इंटरनेटची सुविधा मर्यादित असते, तर काही ठिकाणी वीजपुरवठ्याच्या अडचणींमुळे डिजिटल शिक्षणावर परिणाम होतो. त्यामुळे तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा विस्तार करताना डिजिटल दरी कमी करणे आवश्यक आहे. साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच ती प्रभावीपणे वापरण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ग्रामीण शिक्षणाचे वास्तव मात्र डिजिटल साधनांच्या अभावापेक्षा अधिक व्यापक आहे. अनेक विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर किंवा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबांतून येतात. शेतीचे हंगामी स्वरूप, पीकनुकसान, आर्थिक अडचणी, रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि घरातील जबाबदाऱ्या यांचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. शेतीच्या हंगामात काही मुलांना कुटुंबाला मदत करावी लागते, तर रोजगाराच्या शोधात कुटुंबाचे स्थलांतर झाल्यास त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्याला 'अभ्यासात मागे' म्हणून दोष देण्याऐवजी त्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अनेक ग्रामीण शिक्षक अशा विद्यार्थ्यांशी आणि त्यांच्या पालकांशी सातत्याने संवाद साधून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्याचे प्रयत्न करतात. मर्यादित साधनांमध्येही विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा शिक्षक ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावतो.

ग्रामीण शाळा ही केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारी संस्था नसते; ती गावाच्या सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे केंद्र असते. स्वच्छता, आरोग्य, पर्यावरणसंवर्धन, पाणीबचत, सामाजिक समता, लोकशाही मूल्ये आणि नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यामध्ये शाळेचा मोठा वाटा असतो. शिक्षक विद्यार्थ्यांसोबतच पालक आणि ग्रामसमाजाशी संवाद साधत असल्याने त्याचे कार्य वर्गखोलीच्या पलीकडे विस्तारते. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षकाची भूमिका अधिक संवेदनशील ठरते. घरकामाची जबाबदारी, शाळेचे अंतर, सुरक्षित वाहतुकीचा अभाव, आर्थिक अडचणी आणि काही सामाजिक रूढी यांमुळे मुलींच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ शकतात. अशा वेळी पालकांमध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करणे, मुलींना सुरक्षित वातावरण देणे आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे शिक्षकाचे सामाजिक कर्तव्य ठरते. एका मुलीला शिक्षणाची संधी मिळणे म्हणजे तिच्यासोबत संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढीच्या विकासाच्या शक्यता वाढणे होय.

शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविणे एवढाच नसावा. गुण, श्रेणी आणि निकाल यांना महत्त्व असले तरी ते विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे मोजमाप करू शकत नाहीत. एखादा विद्यार्थी गणित किंवा विज्ञानात प्रावीण्य मिळवू शकतो, तर दुसरा साहित्य, संगीत, चित्रकला, क्रीडा, अभिनय किंवा सामाजिक कार्यात उत्कृष्ट ठरू शकतो. विद्यार्थ्यांची जिज्ञासा, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, सहकार्याची वृत्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सामाजिक संवेदनशीलता यांनाही शिक्षणात समान महत्त्व मिळाले पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार केले पाहिजे. प्रत्येक मुलामध्ये असलेली वेगळी क्षमता शोधून तिला योग्य दिशा देणे हीच शिक्षणाची खरी कसोटी आहे.

शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक विचारांची जडणघडण होणेही आवश्यक आहे. अफवा, चुकीची माहिती, अंधानुकरण आणि पूर्वग्रह वेगाने पसरत असताना प्रत्येक गोष्ट विवेकाने तपासण्याची सवय विद्यार्थ्यांना लागली पाहिजे. 'हे असे का?' हा प्रश्न विचारण्याची वृत्ती ज्ञानाची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारावेत, मतभेद व्यक्त करावेत, माहितीची चिकित्सा करावी आणि स्वतःच्या निष्कर्षापर्यंत पोहोचावे, यासाठी शिक्षकाने त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रश्न विचारणारा विद्यार्थी त्रासदायक नसतो; तो जिज्ञासू असतो. अशा जिज्ञासेतूनच संशोधन, नवोन्मेष आणि सर्जनशील विचारांची निर्मिती होते.

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असल्याने शिक्षकाची भूमिका सामाजिक समता आणि न्यायाच्या निर्मितीतही महत्त्वाची आहे. विविध सामाजिक, आर्थिक, भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीची मुले एकत्र शिकतात. या विविधतेतून समानता, सहकार्य आणि बंधुभावाची जाणीव निर्माण करण्याची संधी शिक्षकाला मिळते. कोणत्याही विद्यार्थ्याशी त्याच्या सामाजिक किंवा आर्थिक परिस्थितीवरून भेदभाव होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. समावेशक शिक्षणाच्या काळात दिव्यांग विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी, विविध भाषिक पार्श्वभूमीची मुले आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना समान संधी देणे ही शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी आहे. एखाद्या विद्यार्थ्याला शिकताना अडचण येत असेल, तर त्याला 'कमकुवत' ठरविण्याऐवजी त्याच्या शिकण्याची पद्धत समजून घेणे आणि आवश्यक ते वैयक्तिक मार्गदर्शन देणे अधिक योग्य ठरते.

या सर्व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना अनुकूल कार्यपरिस्थिती मिळणेही आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण अध्यापनाची अपेक्षा करताना शिक्षकांना आवश्यक शैक्षणिक साधने, प्रशिक्षण, पुरेसा वेळ आणि सर्जनशीलतेला वाव देणारे वातावरण मिळते का, याचाही विचार झाला पाहिजे. अध्यापनाबरोबर विविध प्रशासकीय कामांचा वाढता भार शिक्षकांवर पडत असेल, तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या वेळेवर होऊ शकतो. शिक्षकाला केवळ आदेशांचे पालन करणारा कर्मचारी न मानता शैक्षणिक प्रक्रियेतील महत्त्वाचा बौद्धिक घटक म्हणून पाहणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक अध्यापनपद्धती, समावेशक शिक्षण आणि नवीन मूल्यमापन पद्धती याबाबत शिक्षकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षण मिळाले पाहिजे. स्वतः सतत शिकणारा शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची प्रेरणा निर्माण करू शकतो.

आजच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडेही संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. अभ्यासाचा ताण, स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि करिअरविषयीची चिंता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक दबाव अनुभवत असतात. काहींना आपल्या अडचणी व्यक्त करता येत नाहीत. अशा वेळी शिक्षकाचा संवेदनशील संवाद विद्यार्थ्यासाठी मोठा आधार ठरतो. 'तुझा निकाल काय?' या प्रश्नाबरोबरच 'तुला काही अडचण आहे का?' हा प्रश्न विचारण्याची संवेदनशीलताही शिक्षणाचा भाग आहे. विद्यार्थ्याच्या प्रगतीसाठी पालक आणि शिक्षक यांच्यातील सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ गुणांवर आधारित तुलना करण्याऐवजी विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार त्याच्या प्रगतीकडे पाहिले पाहिजे. घर आणि शाळा या दोन्हीकडून प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थ्याचा आत्मविश्वास अधिक दृढ होतो.

पर्यावरणीय संकटे, पाण्याची समस्या, हवामानातील बदल, सामाजिक विषमता, बेरोजगारी, डिजिटल गैरवापर आणि वाढती सामाजिक असहिष्णुता यांसारख्या प्रश्नांसमोर आजचा समाज उभा आहे. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नाही; सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीवही आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण, सार्वजनिक संपत्तीचे जतन, सामाजिक सहकार्य, संविधानिक मूल्ये आणि नागरिक म्हणून असलेली कर्तव्ये यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे ही शिक्षकाची व्यापक सामाजिक जबाबदारी आहे. आजच्या वर्गखोलीतून उद्याचा समाज घडत असतो. त्यामुळे शिक्षकाचे अध्यापन आणि त्याचे आचरण या दोन्हींचा विद्यार्थ्यांवर दीर्घकालीन प्रभाव पडतो.

शिक्षकाला दिलेली खरी आदरांजली म्हणजे केवळ शिक्षक दिनाच्या दिवशी शुभेच्छा देणे नव्हे. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाचा आणि मूल्यांचा आपल्या जीवनात उपयोग करणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता आहे. एखादा विद्यार्थी प्रामाणिकपणे काम करतो, अडचणीत असलेल्या व्यक्तीला मदत करतो, अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो, स्वतःच्या यशाबरोबर समाजाचाही विचार करतो आणि संकटांना धैर्याने सामोरा जातो, तेव्हा त्याच्या वर्तनातून शिक्षकाच्या कार्याचे खरे प्रतिबिंब दिसते. शिक्षकाच्या कार्याचे अंतिम यश केवळ गुणपत्रिकेत नव्हे, तर विद्यार्थ्याच्या विचारांत, वर्तनात आणि जीवनमूल्यांत दिसून येते.

शिक्षक दिन हा त्यामुळे शिक्षकांचा गौरव करण्याबरोबरच शिक्षणव्यवस्थेच्या भवितव्याचा विचार करण्याचा दिवस आहे. समाजाने शिक्षकांकडून मोठ्या अपेक्षा ठेवताना त्यांना आवश्यक साधने, प्रशिक्षण, सन्मान आणि विश्वास देणेही गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी केवळ शिक्षकांवर सोपवून समाजाची भूमिका संपत नाही. शासन, शिक्षणसंस्था, पालक, विद्यार्थी आणि समाज या सर्वांनी शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक पायाभूत सुविधा, सक्षम शिक्षकवर्ग आणि डिजिटल साधने उपलब्ध करून देणे ही सामाजिक गुंतवणूक आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारली तर त्याचा लाभ केवळ विद्यार्थ्यांना होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासाला मिळतो.

शिक्षक हा वर्तमानातील विद्यार्थ्याला भविष्याशी जोडणारा दुवा आहे. तो अज्ञानातून ज्ञानाकडे, भीतीतून आत्मविश्वासाकडे, अंधानुकरणातून चिकित्सक विचाराकडे आणि स्वकेंद्रिततेतून सामाजिक जबाबदारीकडे नेणारी वाट दाखवतो. त्याच्या हातात केवळ पुस्तक किंवा अध्यापनाचे साधन नसते; भावी समाज घडविण्याची जबाबदारीही असते. म्हणून शिक्षकाचा सन्मान हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून ज्ञानाचा, शिक्षणाचा आणि समाजाच्या भवितव्याचा सन्मान आहे.

५ सप्टेंबरचा शिक्षक दिन एका दिवसापुरत्या औपचारिक शुभेच्छांमध्ये अडकून राहू नये. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण आणि समताधिष्ठित शिक्षण मिळावे, प्रत्येक शिक्षकाला सन्मानपूर्वक व अनुकूल कार्यपरिस्थिती मिळावी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक सुविधा मिळाव्यात, डिजिटल दरी कमी व्हावी, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा आणि शिक्षणातून संवेदनशील, विवेकी व जबाबदार नागरिक घडावेत, हा व्यापक संकल्प या दिवसातून पुढे यायला हवा. शिक्षकाच्या हातातील खडू, लेखणी किंवा डिजिटल साधन हे केवळ अध्यापनाचे माध्यम नसते; त्यातून एका पिढीच्या विचारविश्वाची निर्मिती होत असते. म्हणूनच शिक्षक हा केवळ वर्गखोलीतील अध्यापक नसून उद्याच्या समाजाचा शिल्पकार आहे. ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याला मनःपूर्वक अभिवादन करणे, त्यांच्या कार्याला सक्षम वातावरण उपलब्ध करून देणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांना समान संधी देणे हीच शिक्षक दिनाची खरी सार्थकता ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

# ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स क्षेत्रात पुणे देशात अग्रेसर असणार- मुख्यमंत्री

## मॅग्नमच्या ग्लोबल बिझनेस सोल्युशन्स सेंटरचे वाकडमध्ये मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

### मॅग्नमच्या केंद्रातून एक हजारांहून अधिक रोजगार; कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित तंत्रज्ञान व लॉजिस्टिक्सचा वापर

**पुणे** – ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्सचे (जीसीसी) प्रमुख केंद्र म्हणून पुणे वेगाने विकसित होत असून, पुण्यात आतापर्यंत १३० पेक्षा अधिक जीसीसी कार्यरत झाले आहेत. आगामी एका वर्षात ही संख्या ८०० पेक्षा अधिक होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. जीसीसी क्षेत्रात पुण्याने देशात प्रथम क्रमांकाचे स्थान मिळवावे, हे राज्य शासनाचे लक्ष्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

वाकड येथील ईओएन वेस्ट आयटी पार्कमध्ये मॅग्नम आईस्क्रीम कंपनीच्या ग्लोबल बिझनेस सोल्युशन्स सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार अमित गोरखे, शंकर जगताप, उद्योग, गुंतवणूक व सेवा विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक व धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त विजय सूर्यवंशी, मॅग्नम आईस्क्रीम कंपनीचे मुख्य वित्तीय अधिकारी अभिजीत भट्टाचार्य, यांच्यासह उद्योजक आणि कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र हे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्ससाठी देशातील प्रमुख आणि पसंतीचे गुंतवणूक केंद्र बनले असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुण्यात जागतिक कंपन्यांकडून ग्लोबल व्यवसाय सेवा केंद्रे सुरू करण्याला मिळणारा प्रतिसाद हा शहरातील उद्योगपूरक वातावरण आणि उपलब्ध कुशल मनुष्यबळाची पावती आहे. मॅग्नमचे पुण्यातील केंद्र एक हजारांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करणार आहे. त्यासोबतच अप्रत्यक्ष रोजगारालाही चालना मिळणार आहे. कंपनीच्या जागतिक व्यवसाय प्रक्रिया



अधिक सक्षम करण्यासाठी या केंद्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित तंत्रज्ञान, लॉजिस्टिक्स आणि अन्य आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. उत्पादन, वितरण आणि ग्राहक अनुभवाशी संबंधित प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

शासन आणि उद्योग क्षेत्राने एकत्रितपणे काम केल्यास गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देणारी सक्षम परिसंस्था निर्माण होते. राज्यात गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना आवश्यक ते सहकार्य आणि अनुकूल वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईतील प्रादेशिक मुख्यालयासोबत पुण्यात सुरू झालेले हे ग्लोबल बिझनेस सोल्युशन्स सेंटर मॅग्नमच्या महाराष्ट्रातील विस्ताराला नवी दिशा देणारे ठरेल. पुण्यातील औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा अधिक सक्षम करून ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्ससाठी आणखी आकर्षक केंद्र बनविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. हिंजवडीसह पुण्यातील आयटी क्षेत्राशी संबंधित पायाभूत सुविधांचे प्रश्न सोडविण्यावर शासनाचे विशेष लक्ष आहे. उद्योग आणि गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राकडून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद ही त्याचीच परिणती आहे. गुंतवणुकीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करण्यास शासनाचे प्राधान्य असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

डॉ. पी. अनबलगन म्हणाले, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स ही केवळ कार्यालये नसून देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारी महत्त्वाची इंजिने आहेत. भारताने जगातील आघाडीचे जीसीसी केंद्र म्हणून आपले स्थान निर्माण केले असून, महाराष्ट्र आणि विशेषतः पुणे या वाढीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. पुण्यात गेल्या १५ महिन्यांत जीसीसीसाठी सुमारे ६० लाख चौरस फूट जागेची मागणी झाली आहे. गेल्या १८ महिन्यांत राज्यात १३० नवीन अथवा विस्तारित जीसीसी युनिट्स सुरू झाली आहेत.

आगामी काळात राज्यात ४०० जीसीसी कंपन्या आणि ७०० हून अधिक युनिट्स उभारण्याचे उद्दिष्ट आहे. पुण्यात सध्या ३० पेक्षा अधिक देशांतील कंपन्या २० विविध क्षेत्रांत कार्यरत असून, या क्षेत्रात सुमारे १० हजार मनुष्यबळ कार्यरत आहे. जीसीसी कंपन्यांनी शासनाच्या विविध प्रोत्साहन योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा यासाठी राज्य सरकारकडून आवश्यक ते सहकार्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

कौस्तुभ धवसे यांनी मॅग्नम आईस्क्रीम कंपनी आणि महाराष्ट्र शासन यांच्यातील संबंध विश्वास, विश्वासार्हता आणि परस्पर सन्मानाच्या पायावर उभे असल्याचे सांगितले. कंपनीचे जागतिक नेतृत्व करणारे भारतीय वंशाचे अधिकारी आणि फिलिप्स तसेच एएसएमएलमधील त्यांचा अनुभव प्रेरणादायी आहे. पुण्यातील हे केंद्र या दीर्घकालीन भागीदारीतील महत्त्वाचा टप्पा असून, मॅग्नमच्या भारतीय नेतृत्वासोबत शासन यापुढेही सहकार्य करत राहील, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

मॅग्नम आईस्क्रीम कंपनीचे मुख्य वित्तीय अधिकारी अभिजीत भट्टाचार्य यांनी प्रास्ताविकात महाराष्ट्र शासनाच्या गतिमान निर्णयप्रक्रियेमुळे मॅग्नमचे जागतिक व्यवसाय केंद्र अल्पावधीत साकारल्याचे सांगितले. महाराष्ट्राची सक्षम औद्योगिक परिसंस्था, उत्तम संपर्क व्यवस्था आणि प्रशासनाची तत्परता यामुळे पुण्याची निवड करण्यात आल्याचे भट्टाचार्य यांनी सांगितले. महाराष्ट्राला जागतिक व्यवसाय केंद्रांचे प्रमुख ठिकाण बनविण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दृष्टिकोनाचे त्यांनी कौतुक केले. तसेच, 'बेन अँड जेरी'ज हा जागतिक आईस्क्रीम ब्रँड भारतात आणण्यासोबतच शाश्वत दुग्धव्यवस्थेसाठी महाराष्ट्रासोबत सहकार्य करण्याची इच्छाही त्यांनी व्यक्त केली.

# बजाज फिनसर्व्हच्या अत्याधुनिक मुख्यालयामुळे पुण्याच्या विकासाला नवी दिशा मिळेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पुण्यातील वाहतूक व्यवस्था वेगवान करण्याचा निर्धार मुख्यमंत्र्यांकडून व्यक्त

**पुणे** – बजाज फिनसर्व्हच्या माध्यमातून पुण्यात उभारण्यात येणारे आधुनिक आणि शाश्वत सुविधांनी युक्त मुख्यालय शहराच्या विकासाला नवी दिशा देणारे ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पुण्याला देशातील आधुनिक आणि वेगवान मोबिलिटी असलेले शहर म्हणून विकसित करण्यासाठी शासनाकडून आवश्यक पायाभूत सुविधा वेगाने उभारण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

बजाज फिनसर्व्हच्या प्रस्तावित मुख्यालयाच्या भूमिपूजन समारंभात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, बजाज फिनसर्व्हचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज, बजाज फिनसर्व्ह सीएसआरच्या अध्यक्षा शेफाली बजाज, बजाज फायनान्सचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजीव जैन, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह बजाज समूहातील पदाधिकारी, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, पुणे आणि मुंबई देशातील फिनटेक इकोसिस्टीमची राजधानी झाली आहेत. पहिल्या तिमाहीत मुंबईने बंगळूरुला मागे टाकले असून एकूण फिनटेक गुंतवणुकीपैकी ६१ टक्के गुंतवणूक मुंबईत झाली आहे. फिनटेक स्टार्टअपमध्येही मोठी वाढ झाली असून ५९ टक्के वाढ आणि ९०० दशलक्ष डॉलर्सची गुंतवणूक या क्षेत्रात झाली आहे. ही इकोसिस्टीम नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथेही नेण्याची गरज आहे. लवकरच नागपूरमध्येही बजाज फिनसर्व्हची सेवा सुरू झालेली दिसेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पुणे वेगाने वाढणारे शहर आहे. या वेगाला अनुरूप आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. बाह्य आणि अंतर्गत रिंगरोडसोबत भुयारी मार्गाचे जाळे निर्माण करण्यात येणार आहे. पुढील तीन ते चार वर्षांत पुण्याची ओळख वेगवान वाहतूक व्यवस्था असलेले शहर म्हणून निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. आधुनिक शहर म्हणून पुण्याची ओळख निर्माण करायची असून त्यामध्ये बजाज फिनसर्व्हचा आधुनिक परिसर महत्त्वाची भूमिका बजावेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, पुण्यात उभारण्यात येणारे बजाज फिनसर्व्ह पुणे परिसर आणि त्यातील सुविधा देशातील महत्त्वाची आणि शाश्वत



व्यवस्था ठरणार आहे. या व्यवस्थेत सुमारे ४० हजार कर्मचारी सहभागी होणार आहेत. परिसराला जोडणारा रस्ता आणि अतिरिक्त पूल इमारतींचे काम पूर्ण होण्यापूर्वी उभारण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. बजाज समुहाने पुण्यात कला आणि सांस्कृतिक केंद्र उभारण्याचा मनोदय व्यक्त केला असून महानगरपालिकेसह सर्वांच्या सहकार्याने असे केंद्र उभारण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

आर्थिक व्यवहार आणि बँकिंग क्षेत्रात महाराष्ट्र पुढे असून राज्याला आणखी पुढे नेण्यासाठी विशेष धोरण तयार करण्यात आले आहे. डोमेस्टिक इन्शुरन्स आणि डिजिटल लेंडिंग मार्केटमध्ये महाराष्ट्राने आपले वर्चस्व कायम ठेवावे यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. फिनटेक क्षेत्रात महाराष्ट्राचे नेतृत्व अधिक भक्कम करण्यासाठी बजाज फिनसर्व्हने राज्य शासनासोबत सहकार्य करावे, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

बजाज फिनसर्व्हने फायनान्शियल टेक्नॉलॉजीचा उपयोग करून या क्षेत्रात आधुनिकता आणल्याने फिनटेक क्षेत्रातील महत्वाची संस्था म्हणून या समूहाकडे पाहिले जाते असे नमूद करून बजाज समूहाने स्थापनेपासून भारताचा औद्योगिक विकास आणि राष्ट्रनिर्माणात दिलेल्या योगदानाचा आणि शासनाच्या सामाजिक उपक्रमातील सहभागाचा मुख्यमंत्र्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

**बजाज फिनसर्व्हचा कॅम्पस पुण्याच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेला बळ देईल – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार**

बजाज समूहाचा शंभर वर्षांचा वारसा आणि आधुनिक तंत्रज्ञानाची दूरदृष्टी यांचा सुंदर संगम बजाज फिनसर्व्हच्या नव्या कॅम्पसमध्ये पाहायला मिळणार असून, हा कॅम्पस पुण्याच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेला अधिक बळ देणारा ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला. बजाज फिनसर्व्हचा महाराष्ट्र शासनासोबत ६ हजार कोटी रुपयांचा सामंजस्य करार झाला असून, त्यातून राज्यातील गुंतवणूक आणि वित्तीय सेवा क्षेत्राला चालना मिळेल. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून वित्तीय सेवांना नवी दिशा देण्याचा बजाज समूहाचा प्रयत्न उल्लेखनीय आहे, असे उपमुख्यमंत्री म्हणाल्या.

कृत्रिम बुद्धिमत्ता, फिनटेक, इन्शुअरटेक, डेटा नालिटिक्स आणि डिजिटल वित्तीय सेवा यांसारख्या नव्या क्षेत्रांमध्ये पुण्यातील तरुणांसाठी रोजगार व कौशल्यविकासाच्या मोठ्या संधी निर्माण होत आहेत. या आधुनिक कॅम्पसमुळे नव्या कौशल्यांना, कल्पनांना आणि तरुण पिढीला अधिक संधी मिळतील, असे श्रीमती पवार यांनी सांगितले. बजाज समुहाचे आकुर्डी, वाळूज आणि चाकण परिसराच्या औद्योगिक विकासातही समूहाचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचेही त्या म्हणाल्या.

बजाज फिनसर्व्हचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, पुण्यातील ७.२ दशलक्ष चौरस फुटांचा नवा परिसर शाश्वतता, पर्यावरणपूरक रचना, कर्मचाऱ्यांचे कल्याण आणि तंत्रज्ञानावर आधारित असेल. कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ऊर्जा-पाणी बचत आणि भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या रचनेतून हा परिसर विकसित केला जाणार आहे.



# राजे संभाजी तालीम गणेश महोत्सवाचे भूमिपूजन

**परभणी/प्रतिनिधी**

राजे संभाजी तालीम गणेश मित्र मंडळाचे प्रेरणास्थान खा. संजय जाधव व मुख्य मार्गदर्शक पै. अण्णा डीघोळे यांच्या मार्गदर्शनाखाली मागील पंधरा वर्षांपासून शहरातील जुना कारेगाव रोड पाण्याच्या टाकी समोर गणेशोस्तव मोठ्या थाटामाटात व विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येतो. त्याच अनुषंगाने यावर्षी देखील राजे संभाजी तालीम गणेश उत्सवाची तयारी सुरू करण्यात आली असून आज दि. ४ सप्टेंबर रोजी येथील ठिकाणी भूमिपूजन करण्यात आले यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून नगरसेवक आकाश लहाने, गणेश मंडळाचे अध्यक्ष पै. अर्जुन डीघोळे, निखिल शिंदे, माणिक जवाहर, ज्ञानेश्वर घुगे तसेच गणेश मंडळाचे संस्थापक अध्यक्ष पै. राज डीघोळे, आयोजन समितीचे पदाधिकारी महेश सोनवणे, अमोल तारे, गजानन चव्हाण, ज्ञानेश्वर सरनाईक, शुभम सूर्यवंशी, धनराज नवघरे, ज्ञानेश्वर मानमोडे आदींसह राजे संभाजी तालीम गणेश मित्र मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


Shriram Pratishthan's

Aditya Institute of Pharmacy Selu.

At.Rawalgaon road SeluTq. Selu Dist. Parbhani.

**Admission Notification 2026-27**

Application is invited form the eligible Candidates for admission Direct Second Year B. Pharmacy against institute level seats seats remaining vacant.(If any government CAP round)

| Sr. No | Activities | Dates |
|---|---|---|
| 01 | Invite applications from Registered Candiadates. | 07-09-2026 TO 08-09-2026 |
| 02 | Prepare Display of Provisional Merit List on College website Notice Board. | 09-09-2026 TO 15-09-2026 |
| 03 | admission Reporting to institute for institute level quota against CAP for all categories | 09-09-2026 TO 15-09-2026 |
| 04 | Cut-off Date of all types of admission | 15-09-2026 |

Application form Prospectus will be available at college office. All admission will be carried out as per directives guidelines of CET-CELL ARA Mumbai.The above schedule may vary as per CET-CELL ARA Mumbai Notification. Please refer college website (www.adityainstituteofpharmacy.org) or Contacts us for any query.

Dr. N.V. Patil
Aditya Institute of Pharmacy Selu
Tq. Selu Dist. Parbhani 431506
Mobile No. 9107070765, 8805498808, 7775847850.

# परभणी तालुक्यातील सर्व धान्य लाभार्थ्यांनी ई-केवायसी व मोबाईल सीडींग प्रक्रीया तात्काळ पूर्ण करावी - तहसीलदार डॉ. संदीप राजपुरे

**परभणी/प्रतिनिधी**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि खऱ्या व पात्र लाभार्थ्यांपर्यंत अन्नधान्याचा लाभ पोहोचवण्यासाठी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत विशेष मोहीम राबवली जात आहे. मोहिमेअंतर्गत परभणी तालुक्यातील अंत्योदय अन्न योजना तसेच प्राधान्य कुटुंब योजनेतील (PHM) रेशनकार्डवर नौद असलेल्या प्रत्येक सदस्याची ई-केवायसी (e-KYC) पडताळणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

शासनाने दिलेल्या मुदतीत ई-केवायसी पूर्ण न केल्यास, रेशन तात्पुरत्या स्वरुपात बंद अथवा रेशन कार्ड फ्रिज होऊ शकते व त्यामुळे भविष्यात मिळणारे धान्य वितरण खंडित होण्याची शक्यता आहे. रेशन सुरळीत सुरु ठेवण्यासाठी खालील २ पद्धतींपैकी एका पद्धतीने ई-केवायसी प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन परभणीचे तहसीलदार डॉ. संदीप राजपुरे यांनी केले आहे

**ई-केवायसी (e-KYC) करण्याच्या २ पद्धतीः**

१. ऑनलाईन पदधत (घरबसल्या मोबाईलवरून): (टीपः यासाठी तुमचा आधार नंबर रेशन कार्डशी लिंक असणे आवश्यक आहे).

सर्वात आधी **Google Play Store** वर या **adhaar FaceRD** आणि **चशीर शघधउ** हे दोन ॲप्स इन्स्टॉल करा. **Mera eKYC** ॲप ओपन करा आणि तुमचे **Residential State** (सध्या राहण्याचे राज्य) व **Home State** (मूळ राज्य) निवडून **Proceed** करा. तुमचा आधार नंबर टाका आणि **Generate OTP** वर क्लिक करा. मोबाईलवर आलेला **OTP** व कॅप्चा टाकून डीलाळीं करा.

स्क्रीनवर माहिती दिसेल; तिथे **Face eKYC** पर्यायावर क्लिक करा. कॅमेरा ओपन झाल्यावर तुमचा चेहरा स्कॅन करा (स्कॅन करताना डोळ्यांची हालचाल करा). केवायसी यशस्वी झाल्यावर मेसेज येईल.

**२. ऑफलाईन पद्धत (रेशन दुकानात जाऊन मोफत):**

प्रक्रीया कुठे करावीः लाभार्थ्यांनी आपल्या जवळच्या संबंधित रास्त भाव धान्य दुकानात (रेशन दुकान) जावे.

सोबत आणायची कागदपत्रेः सोबत आधार कार्ड आणि रेशन कार्ड घेऊन जाणे आवश्यक आहे.

बायोमेट्रिक पडताळणीः रेशन दुकानदार ई-पास **(e-Pos)** मशीनद्वारे स्वतःच्या अंगठ्याचा किंवा बोटांचा ठसा देऊन आधार ई-केवायसी विनामूल्य पूर्ण करून देईल.

सर्व सदस्यांची उपस्थितीः रेशनकार्डवर नाव असलेल्या लहान-मोठ्या सर्व सदस्यांनी प्रत्यक्ष रेशन दुकानात जाणे गरजेचे आहे.

**ई-केवायसी झाली की नाही (Status) कसे तपासावे ?**

**Mera Ration** ॲपमध्ये लॉगिन करून तुमची केवायसी आधीच पूर्ण **(Approved)** दाखवत असेल, तर तुम्हाला पुन्हा केवायसी करण्याची गरज नाही.

**तपासण्याच्या स्टेप्सः वरील ऑनलाईन स्टेप्स फॉलो करा.**

माहितीच्या शेवटी **e-KYC** Status समोर **'Y'** लिहिलेले दिसल्यास तुमची केवायसी यशस्वी झाली आहे. (केवायसी मंजूर होण्यासाठी साधारण १.५ ते २ महिन्यांचा कालावधी लागू शकतो).

**इतर महत्वाच्या सूचना :**

मोबाईल सिडींग (मोबाईल नंबर रेशन कार्डशी जोडणे): शिधापत्रिकाधारकांना धान्याच्या वितरणाचे मेसेज **(SMS)**, पावती आणि ऑनलाईन सेवांसाठी ओटीपी **(OTP)** वेळेवर मिळण्यासाठी रेशन कार्डला चालू मोबाईल क्रमांक लिंक **(Seed)** करणे अनिवार्य आहे. ज्या लाभार्थ्यांनी अद्याप आपला मोबाईल क्रमांक जोडलेला नाही किंवा ज्यांचा मोबाईल क्रमांक बदलला आहे, त्यांनी तात्काळ रेशन दुकानदाराकडे आऊन आपला नवीन मोबाईल नंबर अपडेट (सिडींग) करून घ्यावा,

आधार वायोमेट्रिक अपडेटः ज्या लाभार्थ्यांच्या हाताचे ठसे है-पास मशीनवर येत नाहीत किंवा ज्या लहान मुलांचे वय ५ व १५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे आधार बायोमेट्रिक अपडेट झालेले नाही, त्यांनी तात्काळ जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले बायोमेट्रिक अपडेट करून घ्यावे.

रास्त भाव दुकानदारांना निर्देशः परभणी तालुक्यातील सर्व रास्त भाव धान्य दुकानदारांनी आपल्या दुकानाशी संलग्न सर्व लाभार्थ्यांना ई-केवायसी आणि मोबाईल सिडींगबावत योग्य माहिती देऊन १००% काम तेळेत पूर्ण करून घ्यावे,

तरी परभणी तालुक्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता तात्काळ आपली ई-केवायसी व मोबाईल सिडींग पूर्ण करावी आणि शासकीय योजनेचा विनाअडथळा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# जिंतूर तालुक्यात अडीच महिन्यांपासून पावसाने घेतली दडी

## दुष्काळसदृश्य परिस्थिती, बळीराजा हवालदिल



**जिंतूर/प्रतिनिधी**

जतूर तालुक्यात गेल्या अडीच महिन्यांपासून पावसाने पाठ फिरवल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. जून-जुलैमध्ये चांगली सुरुवात झाल्यानंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून पाऊस पूर्णपणे थंडावला आहे. परिणामी खरीप हंगामातील पिके माना टाकू लागली असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे.

तालुक्यात यावर्षी सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर, मूग-उडीद या पिकांची पेरणी केली होती. मात्र गेल्या ७५ दिवसांपासून पावसाचा एकही मोठा पाऊस न झाल्याने जमिनीतील ओलावा संपला आहे. सोयाबीनचे पीक फुलोऱ्यात असताना पाणी न मिळाल्याने शेंगा भरण्याच्या अवस्थेवर परिणाम होत आहे. कापसाची वाढ खुंटली आहे.

**विहिरी, तलावांनी तळ गाठला**

सततच्या पावसाच्या खंडामुळे तालुक्यातील मध्यम प्रकल्प, तलाव आणि विहिरींच्या पाणी पातळीत मोठी घट झाली आहे. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

**शेतकऱ्यांची मागणी**

पेरणीसाठी घेतलेले कर्ज फेडायचे कसे? हा प्रश्न आमच्यासमोर आहे. सरकारने तात्काळ तालुक्यात पाहणी करून दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करावी, अशी मागणी येथील शेतकरी वर्गातून होत आहे.या संदर्भात कृषी विभागा कडे पिकांच्या नुकसानी च्या तातडीने मदतीची मागणी करण्यात आली आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवसांत हलक्या पावसाचा अंदाज वर्तवला असला तरी तो पुरेसा नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. जर लवकरच जोरदार पाऊस झाला नाही तर जिंतूर तालुक्यातील खरीप हंगाम पूर्णपणे वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# देहविक्री करणाऱ्या महिला व कलावंतांना विधी सेवा व शासकीय योजनांबद्दल मार्गदर्शन

**परभणी/प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने गुरुवारी (दि.३)परभणी येथे विधीविषयक सेवांबद्दल जनजागृती तसेच देहविक्री करणाऱ्या महिला व कलावंतांच्या विविध अडीअडचणी जाणून घेण्यासाठी कार्यक्रम घेण्यात आला.




कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एम. सादराणी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये सचिव (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) भूषण म. काळे यांनी उपस्थित महिला व कलावंतांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध असलेल्या मोफत विधी सेवा, कायदेशीर सल्ला व सहाय्य तसेच विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले. तसेच उपस्थितांशी संवाद साधून त्यांच्या विविध अडीअडचणी व समस्या जाणून घेतल्या.

यावेळी देहविक्री करणाऱ्या महिलांना भेडसावणाऱ्या विविध सामाजिक, कौटुंबिक व कायदेशीर अडीअडचणींबाबत सविस्तर चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. महिलांनी आपल्या दैनंदिन जीवनातील विविध समस्या मांडल्या. विशेषतः त्यांच्या मुलांना आधारकार्ड तसेच रेशनकार्ड मिळविताना येणाऱ्या अडचणींचा प्रश्न महिलांनी उपस्थित केला.

तसेच, कलावंतांना भेडसावणाऱ्या विविध अडीअडचणी व शासनामार्फत मिळणाऱ्या मानधनासंदर्भातील प्रश्नांबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली. पात्र कलावंतांना शासनामार्फत मिळणारे मानधन मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही व मार्गदर्शन करण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी सुभाष मस्के, प्रकल्प अधिकारी, महानगरपालिका यांनी महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या बचत गटाशी संबंधित विविध योजना, महिला बचत गटांना उपलब्ध असलेल्या सुविधा व योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.

महिलांनी व कलावंतांनी मांडलेल्या विविध समस्या व अडचणींची नोंद घेण्यात आली. त्यांच्या समस्यांवर उपलब्ध असलेल्या कायदेशीर उपाययोजना व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

समाजातील वंचित, दुर्बल व गरजू घटकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव करून देणे, मोफत विधी सेवा उपलब्ध करून देणे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

# पीएम विश्वकर्मा योजनेतील प्रलंबित लाभार्थ्यांसाठी विशेष कर्ज मेळावे

**परभणी/प्रतिनिधी**

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेंतर्गत कर्जासाठी प्रस्ताव दाखल केलेल्या; मात्र अद्याप बँकेपर्यंत पोहोचू न शकलेल्या तसेच बँकेशी संपर्क होऊनही कर्जाची प्रक्रिया पूर्ण न झालेल्या लाभार्थ्यांसाठी परभणी जिल्ह्यात विशेष कर्ज मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी कार्यालय, परभणी यांच्या पुढाकाराने आयोजित या मेळाव्यांमध्ये संबंधित लाभार्थ्यांची कागदपत्रे तपासून बँकांमार्फत कर्जप्रकरणांची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकूण ६५२ लाभार्थ्यांचा समावेश आहे. योजनेतील प्रलंबित लाभार्थ्यांसाठी जिंतूर (दि.९), परभणी (दि.१०) आणि पुर्णा (दि.१६) येथे मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी संबंधित तालुक्यातील लाभार्थ्यांनी निर्धारित तारखेला आधार कार्ड, पॅन कार्ड आणि प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र आदी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून कर्जप्रकरणाची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या मेळाव्याला बँक प्रतिनिधीही उपस्थित राहणार आहेत. संबंधित लाभार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बालाजी जायभाये यांनी केले आहे.

# करिअर डिस्कव्हरी कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचा मंत्र

## 'केवळ डॉक्टर-इंजिनिअर नव्हे, प्रत्येक विद्यार्थी कौशल्यसंपन्न झाला पाहिजे; एआयच्या युगात स्किलच ठरणार खरी ताकद' -डॉ. संजय रोडगे

**सेलू/प्रतिनिधी**

एल. के. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, सेलू येथे दप्तरविना शाळा उपक्रमांतर्गत करिअर डिस्कव्हरी प्रोग्राम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक कौशल्यांची प्रत्यक्ष ओळख करून देण्यासाठी कुंभारकाम, वेल्डिंग, मेकॅनिकल (इस्त्री, मिक्सर, शिवण मशीन दुरुस्ती), फ्रिज व टॅबलेट मशीन, सिव्हिल इंजिनिअरिंग (घर बांधकाम व रोड मोजमाप), प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन आदी विषयांवरील प्रात्यक्षिके व मार्गदर्शन करण्यात आले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ही शिक्षण प्रणाली संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यासाठी आपण मंत्रालय स्तरावर सादरीकरण केले आहे. विद्यार्थी केवळ मेडिकल व इंजिनिअरिंगपुरते मर्यादित न राहता विविध कौशल्याधारित क्षेत्रांकडे वळले पाहिजेत. येणारे युग कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) चे असून प्रत्येक विद्यार्थ्याकडे कौशल्य विकास असणे काळाची गरज आहे. शाळेत लवकरच अत्याधुनिक स्किल डेव्हलपमेंट लॅब उभारण्यात येणार असून त्यासाठी करिअर डेव्हलपमेंट कार्यक्रम सुरू करण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुबोध हिवराळे, अनिल कुमार, अब्दुल बाशा व मीरा मिरांडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात अपूर्वा पॉलिटेक्निक, सेलू येथील प्राध्यापक व अभियंत्यांनी विविध तांत्रिक क्षेत्रांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच आदित्य फार्मसी कॉलेज येथील प्राध्यापकांनीही फार्मसी क्षेत्रातील करिअरच्या संधींची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी विविध कार्यशाळांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रत्यक्ष कौशल्यांचा अनुभव घेतला.

झाडाझडती हे पत्रक, मालक, मुद्रक व प्रकाशक धनाजी भगवानराव चव्हाण यांनी पृथ्वी इंटरप्राइजेस, ११३, महात्मा फुले पेठ, पुणे ४११०४२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय झाडाझडती - फ्लॅट नं. ५११, रोहीत पाल्मस्, साऊथ विंग, रहाटणी पुणे ४११०१७ येथून प्रकाशित केले. ✻ वाद-विवाद परभणी न्यायकक्षेत. ✻ रजि नं. MAHMAR/२०१२/४५५७७ ✻ email id - dailyzadazadati@gamil.com ✻ tel. no. - 02452 - 220581 ✻ Mo. No. - 9763225051

Printed, Published and owned by DHANAJI BHAGWANRAO CHAVAN and Printed at PRUTHVI ENTERPRISES, 113, MAHATMA PHULE PETH, PUNE 411042 (M.S.) and published at Flat no.511, Rohit Palms, South Wing, Rahatni, Pune 411017 (M.S.). Editor : DHANAJI BHAGWANRAO CHAVAN. RNI.NO. MAHMAR/2012/45577 ✻ email id - dailyzadazadati@gamil.com ✻ tel. no. - 02452 - 220581 ✻ Mo. No. - 9763225051